Shikshan Prasarak Mandal, Banda's

# Raosaheb Gogate College of Commerce and Smt. Saraswatibai Ganshet Walke College of Arts, Banda

Tal. Sawantwadi, Dist. Sindhudurg, State : Maharashtra
[ Accredited by NAAC]

## UGC SPONSORED TWO DAYS NATIONAL LEVEL SEMINAR

**On**

## REGIONAL ISSUES IN INDIA

# Certificate

This is to certify that, Prof. / ~~Dr.~~/ ~~Mr.~~ / ~~Ms.~~ Aawad Vishwanath Mahadeo


of Sahakar Maharshi Shankarrao Mohite Patil College, Akluj

has attended / presented ~~research~~ paper / ~~Chaired~~ / ~~delivered~~ invited plenary lecture in the Seminar organized by the Department of Political Science of this College under the UGC Sponsored Two Day's National Level Seminar, held on 30th and 31st January 2009.

Shikshan Prasarak Mandal, Banda's

# Raosaheb Gogate College of Commerce & Smt. Saraswatibai Ganshet Walke College of Arts, Banda

Tal. Sawantwadi, Dist. Sindhudurg 416510 Maharashtra
(Affiliated to University of Mumbai)





UGC Sponsored
National Level Seminar on

# REGIONAL ISSUES IN INDIA

*Organised by*

Department of Political Science
30th & 31st January 2009

Shikshan Prasarkak Mandal, Banda's
Raosaheb Gogate College of Commerce and Smt.
Saraswatibai Ganshet Walke College of Arts, Banda
Tal: Sawantwadi , Dist :Sindhudurg – 411516
Maharashtra
(Affiliated to University of Mumbai)

UGC Sponsored, Two Days National Level Seminar

On

# REGIONAL ISSUES IN INDIA

Organized by

## Department of Political Science

**Chairperson**
**Dr.V. A. Patil**
Principal
Gogate – Walke College, Banda

**Co-ordinator**
**Prof.Kishor K. Mhetri**
Dept. of Political Science

**Members**

1) **Prof. S. P. Velhal** Head, Dept. of Political Science
2) **Prof. D.G. Joshi** Head, Dept. of English
3) **Prof. A.P.Mahale** Dept of Accountancy
4) **Prof. A.A. Shirke** Librarian

AVID
ST.
APU


| Sr. No. | Title | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 12 | The Jharkhand Mukti Morcha | Miss. Mahadik Trupti K. | 133 |
| 13 | Politics of Marathi Language in Maharashtra. | Prof. Mahajan Viraj | 140 |
| 14 | The Economical Backwardness and demand of separate state of Konkan. | Prof.Mherti Kishor K. | 143 |
| 15 | DMK and AIADMK of Tamil Nadu. | Prof. Padmja Arvind<br>Prof. Gayatri Hari. | 156 |
| 16 | The Controversy on Krishna Water Distribution. | Dr. Patil V.M. | 160 |
| 17 | Regional Parties and Regionalism. | Prof. Patil Parag. | 166 |
| 18 | Democracy and Militancy in Kashmir. | Mr. Paul Jiji | 187 |
| 19 | Emergence of Chattisgarh and the problems of Salva Judum. | Prof. Pillai Mithun. | 193 |
| 20 | Regional Imbalance of Development and Regional Movement. | Dr. Pawar Vaishali | 200 |
| 21 | Samyukta Maharashtra Movement. | Prof. Sonavane P.D. | 204 |
| 22 | Assam Gan Parishad and Regional Parties. | Prof. Velhal S.P. | 222 |
| 23 | Backwardness and demand of separate of Vidrabha. | Dr. Wakode P.T.<br>Prof. Kinhikar S.H. | 233 |
| 24 | Backwardness of Vidarbha : Politics of Deception. | Dr. Yewale Dnyneshwar R. | 237 |

## * दहशतवाद निर्मुलनात शासनाची भुमिका *

प्रस्तावना ः

जागतिक पातळीवर दहशतवाद नवीन नसला तरी ११ सप्टेंबर २००१ च्या वर्ल्ड ट्रेड व पेंटॅगॉन वर झालेला हाल्ल्यानंतर अमेरिकन शासनाने जी भुमिका स्विकारली. आणि त्यानंतर गेल्या १० वर्षामध्ये पुन्हा अमेरिकेत दहशती हाल्ला झाला नाही. त्यामुळे भारतात शासनाला निश्चित अशी व्यापक भुमिका घेवून उपाययोजना कराव्या लागतील. सर्व जग दहशतवादाच्या मुददयावर जर अमेरिकेच्या पाठीशी उभे राहात तर मग आपले शासन नेमके काय करीत आहे हा प्रश्न पडतो आपण केवळ आत्तापर्यतच्या हाल्यामध्ये जगाला पुरावे दिले आता एवढयावर चालणार नाही. काहीतरी ठोस पाउले उचलली पाहिजेत यादृष्टीने संवधित विषय मी आपणासमोर मांडत आहे.

**व्याख्या व अर्थ ः** दहशतवाद निर्मुलनात शासनाची भुमिका शासनाची भुमिका हा विषय आसला तरी दहशतवाद याचा अर्थ व कारणमिमांसा काही प्रमाणात करणे आवश्यक आहे.

*** दहशत terror हा शब्द terrorer किंवा deterre या लॅटीन शब्दापासून आलेला आहे. म्हणजे थरकाप किंवा घाबरविणे**

* युदधशात्राचा प्रणेता **सुन झू** च्या मते "एकाला मारा हाजारोंना भयभित करा ".

* **आंतरराष्टीय संघटनेच्या मते** ः व्यक्तीसमूह किंवा सर्वसाधारण जनतेच्या मनात हेतुपुरस्सर दहशत निर्माण करण्याच्या उददेशाने केलेली योजनावध्द कृती म्हणजे दहशतवाद.

* दहशतवादाचे अनेक प्रकार आहेत प्रचंड स्फोट घडवून आणणे. विमानांचे अपहरण. आत्मघातकी वॉम्वचा वापर. गोळीवार करून दहशत निर्माण करणे. एकादया राज्यात कायमचा असंतोष धगधगत ठेवणे. . रासायनिक शत्राचा . जैविक अस्त्राचा वापर उदा ः अंथ्रेक्स. सरीन इ.

**आज जगात विविध देशांमध्ये वेगवेगळया दहशतवादी संघटना कार्यरत आहेत.**

*भारत ः नागा वंडखोर . माओवादी . हिजवुल मुजाहिददीन . लष्करे तोयवा . हरकत उल अन्सार . उल्फा. काश्मिर लिवरेशन फंट. तालिवान

* जपान ः जपानी रेड आर्मी

*पाकिस्तान ः तालीवान. हरकत उल अन्सार. मुजाहिदद्रीन.

*इराण ः मुजाहिदद्रीन ए खल्क

* फिलिपाईन्स ः अवु सायाव गंट

* श्रीलंका ः एल. टी. टी. ई

*आफगाण ः अल कायदा. तालीवान . इस्लामिक फंट

* क्युवा ः नॅशनल लिव्रेशन आर्मी

* लेवनान ः हिजवुल्लाह

* आर्यलॅड ः आयरिश रिपव्लीकन आर्मी

इत्यादी संघटना विविध देशामध्ये कार्यरत आहेत.

* **दहशत वादाची कारणे ः** दहशतवाद निमुर्लनात शासनाची भुमिका तपासत आसताना मुख्यत्वे त्याची कारणेही तपासली पाहिजेत .

१ . वेकारी वेरोजगारी

२ . नैराश्य गरिवी

३ . सामाजीक उपेक्षा

४ . वाढती धर्मांधता

५ . शासनाची ध्येयधोरणे

६ . शितयुध्द

७ . आर्थिक भरभराट

८ . वैज्ञानिक प्रगती

९ . तस्करी

१० . स्वार्थीपणा इ . प्रमाणे दडपशाही, पिळवणूक, संस्कृती, भाषा, अशी अनेक कारणे आपल्याला सांगता येतील .

वरील सर्व विचार पाहिल्यानंतर शासनाची दहशत निमुर्लनात काय भुमिका असावी याचे विवेचन पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल .

१ . **दहशत प्रतिबंध कायदे व त्यांची अंमलबजावणी योग्यप्रकारे व्हावी ः**

दहशतवाद नष्ट करण्यसाठी प्रथमतः शासनाने कठोर कायदे निर्मीती करणे गरजेचे आहे . व कायदयाचे राज्य निर्माण केले पाहिजे की ज्यायोगे दहशतवादयाना धाक वाटेल . वेळप्रसंगी शासनाला कटू निर्णय घ्यायची वेळ आली तरी चालेल पण कायदयाने दहशतवादयांना चपराक वसली पाहिजे . भारतात टाडा, पोटा यासारखे कायदे असले तरी याचा धाक राहिलेला नाही . दुर्दैवाने किंवा मताच्या राजकारणासाठी दहशतवादयांना दिलेल्या कठोर शिक्षांची अंमलवजावणी होत नाही उदा ः संसद हाल्यातील प्रमुख आरोपी अफजल न्यायालयाने फाशी दिलेली आसताना त्यांचा माफीचा अर्ज राष्ट्रपतीकडे आहे जगाच्या पाठीवर भारत हा एकमेव देश आहे की ज्या देशात देशद्रोह केला तरी दयेचा अर्ज करता येतो . अशी व यासारखी अनेक उदाहरणे सांगता येतील पण महत्वाचे एवढेच की योग्य कायदे निर्मीती होवून त्याची अंमलवजावणी झाली पाहिजे आणि ही जवावदारी पूर्णपणे शसनाची आहे .

२ . **शासनाच्या सर्व यंत्रणामध्ये समन्वय हवा ः**

२६ ११ च्या दहशतवादी हाल्ल्यानंतर एकच गोष्ट समाजसमोर आली ती म्हणजे शासनाच्या यंत्रणेतील कुचकामीपणा मंत्रीमंडळ, गुप्तहेर खाते, पोलीस यंत्रणा, संरक्षण प्रणाली या सर्व व्यावस्था कमी पडल्या हे उघड झाले पोलीस प्रमुख विश्वास नांगर पाटील यांच्या म्हणण्यानुसार किमान दोन वर्प तरी आगोदर गुप्तहेर यंत्रणेने सांगितले होते की मुंवई मध्ये घातपात हामला होवू शकतो . पण याकडे दुर्लक्ष केले गेले याचा परिणाम आपण सगळयांनी भोगलेला आहे . यंत्रणेच्या या समन्वयाअभावी सुमारे एक तास मुंवईत हाल्ला चालू असताना पोलीस गॅंगवार समजत होते आणि यामुळेच चांगले अधिकारी शहिद झाले कोणत्याही प्रकारची नियोजनशुन्य कार्य वाही चालू होती केवळ ८ जणांनी १२२ कोटी लोकांना ६० तास वेठिला धरले तेव्हा शासनाने हि वाव गांभिर्याने

३. **सागरी सिमांची व नैसर्गिक सिमांची सुरक्षितता वाढविली पाहीजे** :

छत्रपती शिवरायांनी ३५० वर्षापूर्वी सागरी सिमांचे महत्व ओळखून खांदेरी पासून सिंधुदुर्ग पर्यंत सागरी किल्ल्यांची रांग तयार करून स्वकिय व परकीय शत्रूची नाकेबंदी केली पण स्वातंत्र्यानंतर ६० वर्ष झाली तरी आमचे सागरी मार्ग मजबूत झाले नाहीत. ९२ च्या दंगलीची स्फोटके आसो. किंवा २६ ११ चा हल्ला आसो दोन्ही सागरी मार्गानेच झाले याची दखल शासनाने गांभिर्याने घ्यायला हवी होती पण याकडे दुर्लक्ष केले. तेव्हा घडलेल्या घटनासमोर ठेवून सर्वच सिमा मजबूत केल्या पाहिजेत केवळ आज फोर्स वन सारख्या संस्था निर्माण करून चालणार नाही तर अत्याधुनिक यंत्रप्रणाली असलेली सर्व साधने तटरक्षक दलाला दिली पाहिजेत नाहीतर मिळालेल्या नैसर्गिक सिमा एक दिवशी हरवून बसावे लागेल शत्रू आज १० १२ च्या संख्यने आला उदया हाजारोंच्या संख्येने येवू शकतो तेव्हा देशाच्या संरक्षण सिध्दतेकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे.

४. **विविध गटांना राष्टीय प्रवाहात सहभागी करून घेतले पाहिजे** :

शासनाने यासाठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे कारण संपूर्ण देशाचा समतोल विकास साधण्याची जबाबदारी शासनाची आहे तेव्हा मागासलेल्या जन जाती जाती समूह आदिवासी अल्पसंख्यांक समूह या व अशा सर्वांना राष्ट्रीय प्रवाहात आणणे आवश्यक आहे देशातील कोणताही वर्ग उपेक्षीत राहणार नाही सर्वाना समान न्याय मिळेल अशा योजना शासनाने कार्यान्वित कराव्यात माओवादी, नक्षलवादी, उल्फा, बोडो, नागा, आसाम गण परिषद काश्मिरी जनता या सर्वाना विश्वास वाटला पाहिजे की हा देश माझा आहे. माजी निवडणूक आयुक्त शेषनच्या मते मी जर काश्मिरमध्ये आसतो तर चालू असलेल्या हिंसाचारापेक्षा जास्त हिंसाचार केला आसता म्हणजेच किती प्रतिकुल स्थितीत तेथील जनता जगत असेल याचा विचार केला पाहिजे; स्थानिक प्रश्नांची योग्य सोडवणूक, शांततेने वाटाघाटीने गरज पडेल तेव्हा कारवाई करून शासनाला करावी लागेल नाहीतर बाहेरच्या देशांनी युध्द करण्यांची आवश्यकता नाही आम्हीच आम्हाला संपवू तेव्हा शासनाने सर्वाचा विश्वास संपादन करून मुख्य प्रवाहात सहभागी करून घेतले पाहिजे.

५. **धर्मांधतेला पायबंद घातला पाहिजे** :

धर्माच्या अधारे ज्या देशाची फाळणी झाली त्यादेशानें एक धडा घेणे आवश्यक आहे ते म्हणजे आपल्या देशातील वाढती धर्मांधता कमी कशी होईल. जग २१ शतकाची वाटचाल करीत आहे आणी आम्ही पुराणात अडकून पडून धार्मिकतेला खतपाणी घालीत आहे जगातील अंतर कमी होत आहे पण आम्ही मनाने दूर जात आहोत राजकीय पक्ष, नेते, धार्मिक संघटना धार्मिक जहर पसरवित आहेत धर्मरक्षणाची हिंसाचारी विकृत विचारसरणी समाजासमोर उभी आहे आणि त्यातुनच अतिरेकी प्रवृत्ती तयार होताना दिसताहेत. आज बॉम्ब स्फोटामध्ये केवळ मुस्लीम नाहीत तर सनातन सारख्या हिंदु संस्थाही सहभागी आहेत हे उघड होत आहे. अशा परिस्थीतीत सरकारचे कर्तव्य बनते की धार्मीक तेढ कमी करण्यासाठी उपाययोजना करावी.

६. **शिक्षण व्यवस्थेत अमुलाग्र बदल केला पाहिजे** :

लार्ड मेकॅलेने इग्रंजांसाठी तयार केलेली शिक्षणव्यवस्था इंग्रजासाठी उपयुक्त होती स्वातंत्रनंतर आम्ही व राज्यकर्ते यामध्ये फारसे बदल करू शकले नाहीत परिणांमी राष्ट्रप्रेमी नागरिक तयार होण्यापेक्षा तो फक्त डिग्री घेणारा परिक्षार्थी तयार होत आहेत. लोकमान्य म्हणायचे ही शिक्षण व्यावस्था शिक्के ठोकण्यापलीकडे जावू शकत नाही. शिक्षणाने माणूस शहाणा होण्यापेक्षा तो अधिकधिक भरकटत चालला आहे. आणि मग शिक्षणाने मिळालेले शहाणपण समाजात दोन वेळच्या अन्नाची गरज पूर्ण करू शकत नसेल तर मग वेगळा मार्ग तरूण निवडताना

दिसताहेत तेव्हा शासनाने दर्जेदार, उपयुक्त, रोजगाराभिमुख, समाजमन सांधणारी, राष्ट्रप्रेम निर्माण करणारी शिक्षण व्यावस्था निर्माण गरजेचे आहे.

**७. प्रशासन व्यवस्था सुधारली पाहिजे :**

कोणत्याही देशाची पगती त्या देशाच्या प्रशासन कार्यक्षमतेवर अवलंवून असते. आणि ही व्यावस्था लाचलुचपत, भ्रष्टाचाराने बरबटलेली असेल व पैशाशिवाय कोणतीही कामे होत नसतील तर गरिब श्रीमंत हा भेद म्हणजेच आहेरे आणि नाहिरे वर्ग आपोआप तयार होतो आणि अन्यायाच्या भावनेने तरूण अतिरेकी मार्गाकडे वळतो. तेव्हा आस्तित्वात असलेल्या पशासनाने प्रामाणिकपणे कार्य करण्याची आवश्यकता आहे. पैशाच्या लालसेपोटी अनेक अधिकारी गोपनीय माहिती देतात परीणामी दहशतवादयांचे काम सोपे होते. तेव्हा शासनाने सर्वप्रथम पशासन यंत्रणा सुधारणे गरजेचे आहे.

**८. आतंरराष्ट्रीय कायदे यशस्वी होण्यासाठी प्रयत्न करावेत :**

जागतिक संघटनेने दहशतवादाला प्रतिवंध करण्यासाठी वेगवेगळया परिपदा भरवून अनेक नियम केलेले आहेत दुर्दैवाने त्याची अंमलवजावणी योग्यप्रकारे होवू शकली नाही त्यामुळे दहशतवादाच्या विरोधात जगतिक चळवळ सुरू झाली नाही. तेव्हा शासनाने जाणिवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत १९६९ हेग व १९७० टोकिओ व इतर परिपदातील निणर्याची अंमलवजावणी झाली पाहिजे.

**९. अमेरिकन शासनासारखे निर्णय घ्यावेत :**

११ सप्टेंवर २००१ मध्ये झालेल्या हाल्ल्यांनंतर जे निर्णय अमेरिकन शासनाने घेतले आणि कारवाई केली तसे निर्णय शासनाला घ्यावे लागतील व डिपार्टमेंट ऑफ होमलॅंड सेक्युरिटी सारखी मध्यवर्ती संस्था निर्माण करावी संकटकाळात ताळमेळ राखण्यासाठी निर्माण करणे आवश्यक आहे.

**१०. प्रसारमाध्यमावर नियंत्रण व सामाजिक शिस्त निर्माण करावी :**

महत्वाचे म्हणजे सामाजिक शिस्त भारतात निर्माण होणे अत्यंत गरजेचे वनले आहे. प्रत्येक गोप्टीचा मी साक्षीदार व्हावे ही भारतीयांची भुमिका निश्चीतच अडथळा ठरलेली आहे २६ ११ च्या पोलीस कारवाई वेळी हा अनुभव सर्वानाच आला आणि त्याचवरोवर प्रसारमाध्यमांवरही काही प्रमाणात नियंत्रण शासनाने आणले पाहिजे कारण टी आर पी च्या मागे धावणारी माध्यमे किती त्रासदायक ठरू शकतात हे हवाई कारवाई चे प्रत्यक्ष चित्रण २६ ११ ला दाखविल्यानंतर शासनाच्या ध्यानात आले त्याच्याच आधारे दहशतवादयांना सुचना मिळत होत्या तेव्हा लोकशाहीच्या या ४ थ्या स्तंभावर नियंत्रण शासनाने ठेवणे अतिशय गरजेचे वनले आहे

**११. अत्याधुनिक शत्रे व संरक्षण साहित्य दयावे :**

२६ ११ च्या हाल्यामध्ये शाहिद झालेले सर्व अधिकारी हे कुचकामी संरक्षण साहित्यामुळ शाहिद झाले त्यांना दिलेली बुलेटप्रुप जॅकेट कालवाहय होती आणि शत्रांच्या वावतीतही पोलीस कमांडो सर्वजण हतवल होते अतिरेकी वॉम्बचा वापर करीत होते आणि आमचे अधिकारी हातामध्ये वंदुका पिस्टल घेवून प्रतिकार करीत होते तेव्हा सरकारने अत्याधुनिक शस्त्रे संरक्षण व्यवस्थेला पुरविणे आवश्यक आहे

**समरोप :**

वरील विविध संकल्पनाव्दारे शासनाने दहशत निमुलनसाठी कोणती भुमिका घ्यावी हे स्पप्ट केले असले तरी समाजातल्या प्रत्येक घटकाचा सहभाग असल्याशिवाय कोणतेही शासन याचा मुकावला एकटयाने करू शकणार नाही हे ही खरे आहे तेव्हा प्रत्येक व्यक्तीने दहशतवादाचा मुकावला केला पाहिजे केवळ मेणवत्ती पेटवून उतू जाणारी देशभक्ती निर्माण न करता केवळ शहिदांच्या फोटोवर माळा न चढविता स्वतःच्या क्षेत्रात प्रामाणिकपणे कार्य केले पाहिजे तरच या

दहशतविरोधी लढयामध्ये आपण यशस्वी होवू शकतो केवळ शासनावर ही जवाबदारी टाकून चालणार नाही तर समाजाचे .देशाचे ऋण फेडण्याचा पयत्न सर्वांनिच केला पाहिजे तरच दहशतवाद नष्ट होवू शकतो.


संदर्भ ः

१ . लोकप्रशासन व राज्यशात्र परिषद २००३ माहितीपुस्तिका

२ . लोकसत्ता वर्तमानपत्र

३ .शिवाजी व शिवकाल जयसिंगराव पवार

४ .सहयाद्री वाहिनी विश्वास नांगरे पाटील याची मुलाखत

५ .प्रधान समितीचा अहवालावर वर्तमान पत्रातील कात्रणे



प्रा . विश्वनाथ महादेव आवड

शंकरराव मोहिते महाविघालय. अकलूज

तालुका ः माळशिरस जिल्हा ः सोलापूर

४१३१०१